INTERNATIONAL JOURNAL OF ECONOMIC SOCIAL SCIENCE AND MANAGEMENT LAW
Peer Reviewed, Referred & Indexed Journal
E-ISSN: 3070-0558
VOL.7, NO.1(1) (2026)

# महात्मा गांधी- एक विचारपीठ

डॉ दिगंबर दत्तात्रय कापसे

प्राचार्य, समर्थ महाविद्यालय, लाखनी

जिल्हा- भंडारा ( महाराष्ट्र)

मोबाईल नंबर -9921483015

प्रस्तावना

इतिहासाची पाने चाळताना अनेक व्यक्ती व्यक्तिगत येथे आहे निर्माण करण्यात आपली आयुष्य खर्च करतात तर काही व्यक्ती आपला समूह आपले वर्तुळ इतक्या पुरतीच मर्यादित राहतात काही व्यक्ती वर्तुळापलीकडे जाऊन इतर व्यवस्थांना छेद देतात तर काही व्यक्ती संपूर्ण आकाश व्याप्त करून स्वतःला सिद्ध करतात. जगातील अनेक महान व्यक्ती जागतिक इतिहासाला कलाटणी देण्याचा प्रयत्न केलेला आढळून येतो काहींचा प्रभाव काही वर्षापुरता काही शतकांपुरता तर काहींचा प्रभाव अनंत काळाकरता प्रस्थापित होत असतो त्यांच्या प्रभावाला कमी अधिक प्रमाणात ओहोटी येत असेलही परंतु तो प्रभाव पटलावरून कधीही पुसल्या जात नाही अशा व्यक्ती खऱ्या अर्थाने महात्मा ठरतात.

भारतालाच नव्हे तर जगाला विसाव्या शतकात मिळालेली अच्युतम देणगी म्हणजे महात्मा गांधी. आज संपूर्ण जग महात्मा गांधी यांची ओळख करून घेण्यात स्वतःला धन्यता मानते यावरूनच महात्मा गांधी यांच्या महान कार्याची ओळख सिद्ध होते. जागतिक पटलावर सर्वाधिक मान्यता प्राप्त नेतृत्व नेता ऋषी महामानव योगी देव आत्मा महात्मा गांधी

## महात्मा गांधी व भारतीय स्वातंत्र्य लढा - विचार दर्शन

महात्मा गांधी यांचे विचार हे सर्वसामान्यांना केंद्रीभूत म्हणून साकारलेले तत्त्वज्ञान होय. भारतीय स्वातंत्र्य लढा वेगवेगळ्या अंगाने लढल्या गेला मवाळवादी जहालवादी क्रांतिकारी अशा विविध मार्गाने हा लढा पुढे जात होता परंतु हा लढा सर्वव्यापी बनवण्याच्या अनुषंगाने सर्वसामान्य जनता जोपर्यंत या लढ्यात बहुसंख्येने सहभागी होणार नाही तोपर्यंत सर्व लढे ही निष्फळ ठरतील याची जाणीव महात्मा गांधी यांना होती म्हणूनच सर्वसामान्यांना या लढ्यात सहभागी करून घेण्याकरिता त्यांना निर्भय बनवणे आवश्यक होते. व त्याकरिता एक नवीन मार्ग उपलब्ध करून देणे ही काळाची गरज होती. असे झाले तरच इतिहास घडणार होता. स्वातंत्र्यलढ्याबाबत महात्मा गांधींनी काढलेला हा निष्कर्ष व त्यातून साकार होत गेलेले त्यांचे तत्त्वज्ञान यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनातील भीती दूर होऊन ते बलाढ्य ब्रिटिश साम्राज्य विरुद्ध लढण्यास तयार झाले याकरिता महात्मा गांधी यांनी सत्याग्रह, अहिंसा, असहकार,स्वदेशी या तत्त्वांचा अवलंब केला व त्यातून भारतीय स्वराज्याचा सूर्य उगवला.

दक्षिण आफ्रिकेतून सत्याग्रहाचे शस्त्र घेऊन महात्मा गांधी भारतात पाठवला आपले राजकीय गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आदेशानुसार भारत भ्रमण केले व भारतीयांचे जवळून निरीक्षण व अवलोकन केले त्यांची विचारसरणी समजून घेतली त्यांची आकलन क्षमता जाणली स्वराज्याविषयी जनतेच्या कल्पना समजून घेतल्या स्वराज्याकरिता त्यांच्या योगदान पद्धती याचाही अभ्यास केला एकूण सर्व अभ्यासांती सर्व भारतीयांनी या लढ्यात सहभागी होण्यासाठी महात्मा गांधींनी नियोजन केले व या नियोजनानुसार स्वातंत्र्यलढ्यात आपली विविध शस्त्र प्रसंगानुप वापरली त्याचाच परिपाठ म्हणून महात्मा गांधींच्या काळात स्वातंत्र लढ्यातील जनतेचा सहभाग हा सातत्याने वाढत गेला लोकांनी गांधी तत्त्वज्ञानाला केवळ सहकार्य केले नाही तर त्याचे समर्थन करून अवलंबही केला हे वेगळेपण गांधी तत्त्वज्ञानाची म्हणता येईल. सर्वप्रथम शेतकऱ्यांच्या प्रश्नाला वाचा फोडून गांधींनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात आपला योगदानाचा श्री गणेशा केला त्यांनी 1920 22 मध्ये चालवलेले असहकार आंदोलन हे भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील पहिले व्यापक आंदोलन ठरले व गांधींच्या प्रवास अविरत स्वातंत्र्य मिळेपर्यंत सुरू झाला काळाच्या ओघात सायमन गो बॅक या आंदोलनाने महात्मा गांधींना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर स्थान मिळवून दिले व भारतात पुढे आलेल्या महात्मा गांधींना व त्यांच्या आंदोलनांना आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळू लागली. त्याचाच परिपाक म्हणून ब्रिटिश साम्राज्याने महात्मा गांधींची नोंद घेऊन त्यांच्यासोबत प्रसंगी राजकीय वाटाघाटी घडवून आणल्या हा त्याचाच परिपाक होय भारतीय घटनात्मक विकासाला सुद्धा यामुळे जालना मिळाली घटनात्मक विकासाच्या अनुषंगाने 1919 नंतर बळकटी प्राप्त झाल्याची दिसून येते यामागेही गांधींचे योगदान अतुलनीय आहे दुसऱ्या गोलमेज परिषदेमध्ये लंडनला जाऊन महात्मा गांधी सहभागी झाले होते हा त्याचा सिद्ध हस्त पुरावा ठरेल. दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर महात्मा गांधींनी ब्रिटिशांना भारतातून चले जाव असा निर्वाणीचा इशारा दिला व भारतात चले जाव आंदोलन सुरू करण्यात आले या आंदोलनात कधी नव्हे एवढे भारतीय स्वतःहून सहभागी झाले त्यामुळे ब्रिटिश साम्राज्य सुद्धा हादरले व ब्रिटनचे पंतप्रधान यांनी क्लेमेंट ॲटली यांनी भारताला स्वातंत्र्य देण्याची केवळ घोषणाच केली नाही तर जून 1948 पूर्वी ब्रिटिश आपल्या मायदेशी निघून जातील अशी घोषणा केली. सुमारे 90 वर्षाचे पारतंत्र्य संपुष्टात येऊन भारत भूमीवर स्वातंत्र्यसूर्य उगवला.

निष्कर्ष

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक थोर स्वातंत्र्यवीरांनी आपले योगदान दिले आहे. महात्मा गांधी यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण आहे जोपर्यंत कोणत्याही स्वातंत्र लढ्यात जनतेचा सहभाग जोपर्यंत अत्युच्च पातळी गाठत नाही तोपर्यंत स्वातंत्र्य मिळणे अशक्य प्राय असते महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्य लढ्यात सर्वसामान्य जनतेला सहभागी करून घेतले स्वातंत्र लढ्यातील त्यांच्या भावना तीव्र केल्या. सर्वसामान्य जनतेच्या मनातील न्यू गंड दूर करून त्यांना स्वातंत्र्यलढ्यात सामावून घेतले सर्वसामान्यांच्या मनात असलेली भीती भय त्यांनी दूर केली यामुळे सामान्य जनता ही तुरुंगाला देवालय समजू लागले यामुळे स्वातंत्र लढ्यातील जनतेचा वाढलेला सहभाग ब्रिटिश साम्राज्यवादन करिता डोकेदुखी ठरला व यातूनच भारतीय स्वातंत्र्य जवळ

आले. सर्वसामान्य भारतीयाला स्वातंत्र्यलढ्याचा सैनिक बनवण्याची कार्य गांधी तत्वज्ञानाने केले म्हणून महात्मा गांधी स्वातंत्र्य लढ्यातील मुकुटमणी ठरतात.

संदर्भ

1. एम.के. गांधी: ग्राम स्वराज; नवजीवन प्रकाशन गृह, अहमदाबाद
2. माझे सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
3. गांधी विचार दर्शन - बाळासाहेब भारदे
4. महात्मा गांधी यांचे संकलित वाड्मय खंड - अनुवादक - त्र्य.वी. पर्वते